**ठळक बातम्या**

- जीएसटी मधे येत्या दिवाळीत सुधारणा करण्याची प्रधानमंत्र्यांची घोषणा
- जुलै महिन्यात निर्यातीत ३७ अब्ज डॉलरपेक्षा जास्त वाढ
- उत्तम शिक्षण आणि मनुष्यबळ विकासाच्या जोरावर महाराष्ट्र देशाच्या विकासाचं नेतृत्व करेल, असा मुख्यमंत्र्यांना विश्वास

**आणि**

- जम्मू-काश्मीरच्या किश्तवाड जिल्ह्यात ढगफुटीच्या बळींची संख्या ४५

**<><><><>**

येत्या दिवाळीत जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा कर प्रणालीत सुधारणा करण्यात येईल, अशी घोषणा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली. जीएसटी लागू होऊन आठ वर्षे झाली असून आता या प्रणालीचा फेरआढावा घेण्याची वेळ आली आहे, असं ते म्हणाले.

**- होल्ड बाईट मोदी - -**

जीएसटी सुधारणा केल्यावर नागरिकांवरचा कराचा भार कमी होईल, लघु उद्योगांना लाभ होईल, तसंच दैनंदिन वापराच्या वस्तू स्वस्त होतील, असं प्रधानमंत्री म्हणाले. एकोणऐंशिव्या स्वातंत्र्यदिनानिमित्त राजधानी दिल्लीत लाल किल्ल्यावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज ध्वजारोहण झालं. ध्वजारोहण झाल्यावर हवाई दलाच्या हेलिकॉप्टरने उपस्थितांवर फुलांचा वर्षाव केला. यावेळी प्रधानमंत्र्यांनी ऐतिहासिक लालकिल्ल्यावरून देशवासियांना संबोधित केलं. ऑपरेशन सिंदूरमधे कर्तृत्व गाजवणाऱ्या सैनिकांचं प्रधानमंत्र्यांनी यावेळी कौतुक केलं. देशाला व्यथित करणाऱ्या पहलगाम हल्ल्याचं प्रत्युत्तर ऑपरेशन सिंदूरद्वारे दिलं, असं प्रधानमंत्री म्हणाले. यापुढं दहशतवाद्यांनी आगळीक केल्यास सडेतोड उत्तर देऊ असा असा इशारा त्यांनी दिला. अण्वस्त्रांच्या धमक्यांना आम्ही घाबरत नाही, असं मोदी यांनी सांगितलं. तसंच देशाची सुरक्षायंत्रणा मजबूत करण्यासाठी मिशन सुदर्शनचक्र ही प्रणाली विकसित करणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

२१ वं शतक हे तंत्रज्ञानाचं शतक असून भारत यात वेगानं मार्गक्रमण करत असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. त्यासाठी प्रत्येक क्षेत्रात आधुनिक परिसंस्था उभारण्याचं येत असल्याचं सांगून त्यांनी सेमीकंडक्टर तसंच अंतराळ संशोधन क्षेत्रात देशाने केलेल्या कामगिरीचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेची महत्त्वपूर्ण घोषणा प्रधानमंत्र्यांनी आजच्या स्वातंत्र्यदिनी केली. सुमारे १ लाख कोटी रुपयांची तरतूद असलेली ही योजना देशभरात आजपासून लागू होईल. या अंतर्गत खाजगी क्षेत्रात पहिली नोकरी मिळवणाऱ्यांना सरकारकडून १५ हजार रुपये मिळतील असं त्यांनी सांगितलं.

शेतकऱ्यांच्या, पशुपालकांच्या, मच्छीमारांच्या हिताला तसंच वंचित वर्गाच्या हिताला सरकारचं प्राधान्य आहे, असं मोदी म्हणाले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला यंदा शंभर वर्ष पूर्ण होत आहेत, त्या निमित्तानं संघाच्या कार्याला त्यांनी वंदन केलं.

लाल किल्ल्यावर आयोजित या कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, इतर केंद्रीय मंत्री, वरिष्ठ अधिकारी आणि मोठ्या संख्येनं  नागरिक उपस्थित होते.

स्वातंत्र्यदिनाचा मुख्य सोहळा सुरू होण्यापूर्वी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सकाळी राजघाटावर जाऊन महात्मा गांधी यांच्या समाधीवर तसंच हुतात्मा स्मारकावर जाऊन पुष्पांजली अर्पण केली. त्यानंतर लाल किल्ल्यावर प्रधानमंत्र्यांनी तिन्ही सेनादलांकडून मानवंदना स्वीकारली. तसंच सेनादलांनी विविध कवायतींचं प्रदर्शन केलं.

**<><><><>**

राजधानी दिल्लीतल्या मुख्य कार्यक्रमासह देशभरात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा होत आहे. केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह, डॉ. एस. जयशंकर, नितीन गडकरी, डॉ. जितेंद्र सिंह, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी शासकीय निवासस्थानी तिरंगा फडकावला. **सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई** यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या आवारात ध्वजवंदन केलं.

**दिल्लीतल्या दोन्ही महाराष्ट्र सदनांमध्ये** निवासी आयुक्त आणि सचिव आर. विमला यांनी राष्ट्रध्वज फडकावला.

**<><><><>**

भारताची निर्यात जुलै महिन्यात मोठ्या प्रमाणात वाढली असून यात ३७ अब्ज डॉलरपेक्षा जास्त वाढ झाल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं म्हटलं आहे. या निर्यातीत प्रामुख्याने अभियांत्रिकी वस्तू, हिरे आणि दागिने, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, औषधं तसंच सेंद्रिय आणि अजैविक रसायनांचा समावेश आहे. यात एकट्या अभियांत्रिकी वस्तूंच्या निर्यातीत ३४ टक्के वाढ झाली आहे. दरम्यान, जुलै महिन्यात व्यापारी तुटीत वाढ होऊन ती २७ अब्ज डॉलरपेक्षा जास्त झाल्याचं या आकडेवारीत म्हटलं आहे. या कालावधीत वस्तू आणि सेवांची निर्यात २७७ अब्ज डॉलरपेक्षा जास्त झाल्याचा अंदाज वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या आकेडवारीत वर्तवण्यात आला आहे.

**<><><><>**

देशाच्या ७९व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त राज्यात मंत्रालय इथं मुख्य शासकीय सोहळा झाला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. यावेळी मुख्यमंत्र्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान दिलेल्या सर्व स्वातंत्र्य सैनिकांना तसंच शहीद जवानांनाही आदरांजली वाहिली. जगातली सर्वोत्तम उत्पादनं भारतात तयार करण्यासाठी प्रयत्न करणं गरजेचं असल्याचं ते उपस्थितांना संबोधित करताना म्हणाले.....

**--होल्ड- बाईट- मुख्यमंत्री--**

देशात येत असलेल्या परदेशी गुंतवणुकीपैकी ४० टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात येत आहे, तसंच वस्तू निर्मिती, निर्यात आणि स्टार्ट-अप्समध्ये महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर असल्याचं त्यांनी सांगितलं. उत्तम शिक्षण आणि मनुष्यबळ विकासाच्या जोरावर महाराष्ट्र देशाच्या विकासाचं नेतृत्व करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आपल्या भाषणातून त्यांनी प्रत्येक समाज घटकाचा तसंच पायाभूत सुविधांच्या विकासासाठी केल्या जात असलेल्या कामांविषयी सांगितलं. छत्रपती शिवाजी महाराज आणि संतांनी दाखवलेल्या वाटेवर महाराष्ट्र चालत राहील, असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वर्षा या त्यांच्या निवासस्थानीही ध्वजारोहण झालं.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी पुण्यात राजभवन इथं राष्ट्रध्वज फडकावून तिरंग्याला मानवंदना दिली.

मुंबईत स्वातंत्र्यदिनाचा उत्साह जागोजागी दिसून येत आहे, हरघर तिरंगा अभियानाअंतर्गत अनेक निवासी वस्त्या आणि इमारतींवर तिरंगा डौलानं फडकत असल्याचं चित्र आहे, रस्त्यारस्त्यांवर आबाल-वृद्धांच्या हाती दिसणारा तिरंगा आणि जागोजागी देशभक्तीपर गीतांचे सूर कानी पडत असल्यानं अवघं वातावरण देशभक्तीनं भारलेलं आहे.

मुंबईत विधान भवन इथं विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांच्या हस्ते आणि ध्वजारोहण झालं. यावेळी विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे आणि विधानपरिषदेचे विरोधीपक्षनेते अंबादास दानवे उपस्थित होते.

मुंबईत वर्ल्ड ट्रेड सेंटर इथं झालेल्या कार्यक्रमात विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी झेंडा फडकावला.

मुंबई उच्च न्यायालयात मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं.

मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते ध्वजारोहण केलं गेलं, तर मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालय प्रांगणात झालेल्या कार्यक्रमात जिल्हाधिकारी आंचल गोयल यांनी राष्ट्रध्वज फडकावला.

बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयात झालेल्या कार्यक्रमात महानगरपालिका आयुक्त आणि प्रशासक भूषण गगराणी यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. यावेळी राष्ट्रपती गुणवत्ता सेवा पुरस्कार जाहीर झालेल्या मुंबई अग्निशमन दलाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा सत्कार केला गेला.

मध्य रेल्वेच्या मुंबई इथल्या राष्ट्रीय मुख्यालयात मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धर्म वीर मीना यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं.

आकाशवाणीच्या मुंबई केंद्रात झालेल्या कार्यक्रमात केंद्राचे उपमहासंचालक संजय बोदेले यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं... यावेळी त्यांनी श्रोत्यांपर्यंत माहिती पोहचवण्यासाठी आकाशवाणी करत असलेल्या प्रयत्नांबद्दल सांगितलं....

**- - होल्ड - बाईट - -**

**- <><><><>**

जम्मू-काश्मीरच्या किश्तवाड जिल्ह्यात काल झालेल्या ढगफुटीमुळे किमान ४५ जणांचा मृत्यू झाला असून यात सीआयएसएफचे दोन कर्मचारी आणि मछैल माता यात्रेसाठी आलेल्या अनेकांचा समावेश आहे. आत्तापर्यंत वाचवण्यात आलेल्या शंभरपेक्षा जास्त जणांपैकी ३८ जणांची प्रकृती गंभीर आहे. असंख्य नागरिक अद्याप बेपत्ता असून मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती आहे. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, राज्य आपत्ती प्रतिसाद दल, पोलीस, लष्कर आणि स्थानिकांच्या मदतीनं मदत आणि बचाव कार्य सुरू आहे. या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा आणि मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्याशी संवाद साधला आणि परिस्थितीची माहिती घेतली.

**//<><><><>//**